नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १६/०५/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## वेकोली(डब्लु.सी.एल)/एस.बी.आय मध्ये नोकारचे आमिष दाखवुन कोट्यावधीची फसवणुक करणाऱ्या टोळीचा छडा नागपूर ग्रामीण अर्थिक गुन्हे शाखेची कारवाई

केळवद पोलीस स्टेशन येथे दिनांक २६/०७/२०२१ रोजी तक्रारदार नामे श्री— सतिश प्रकाश आढे वय ३० वर्ष, रा. खुरजगाव ता. सावनेर, जि. नागपूर यांनी तक्रार अर्ज दिला की, विरोधी इसम नामे १. अमीत कोवे २. शिल्पा पालपर्ती ३. रमेश कामोने सर्व राहणार नागपुर यांनी तक्रारदारास वेस्टन कोलफिल्ड लि. किंवा स्टेट बॅक ऑफ इंडीयामध्ये नोकरी लावून देण्याचे आमिष देवून तक्रारदार व त्यांची पत्नी यांना १० लाख रू. लाख मागणी करून, नोकरी संदर्भात त्यांना मुलाखतीचे बोगस मेल पाठवून व नेमणूकीबाबत बोगस अपॉईमेंन्ट लेटर देवून फिर्यादी व त्यांची पत्नी यांना दिल्ली आणि औरंगाबाद महाराष्ट्र येथील, एस.बी.आय. बॅक कार्यालयात बोलावून त्यांचेकडून वेळोवेळी पुर्वनियोजीत कटातुन रक्कम मागणी करून अर्जदार यांचे पत्नीला नोकरी लावून दिली नाही व अर्जदार यांचे घेतलेल्या रक्कमेपैकी ११,१७,०००/— रू. परत न करता अपहार करून फसवणूक केली. याबाबतची चौकशी तक्रार अर्जावरुन चालु होती.

तक्रारदार नामे श्री. सतिश प्रकाश आढे वय ३० रा. खुरजगाव ता. सावनेर, जि. नागपूर यांनी वरील आशयाचा पुन्हा दुसरा अर्ज दिनांक ०१/०१/२०२२ रोजी मा. पोलीस अधिक्षक कार्यालयात दिला. त्यानुसार मागील चौकशीवरुन केळवद पोलीस स्टेशन अपराध क्रमांक ०९/२२ कलम ४०६, ४११, ४१३, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) भादवी दाखल करण्यात आला. सदरहु गुन्हयाचा तपास आर्थीक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे कडुन करण्यात येत आहे. सदरहु तक्रार अर्जाची प्राथमिक चौकशी चालु असतांना, आरोपीत इसम नामे अमित मारोती कोवे यांनी धंतोली पोलीस स्टेशनच्या हददीत विष प्राशन करुन आत्महत्या केली. त्याबाबत धंतोली पोलीस ठाणे तपास करीत आहे.

मयत आरोपीत अमित मारोती कोवे यांचे पत्नीचा व मुलाचा सविस्तर जबाब नोंद करण्यात आला. त्यांचेकडुन मयत अमित कोवे यांचा मोबाईल जप्त करण्यात आला असुन तो तपासला असता, त्यामध्ये अमित कोवे यांनी गोंदिया, नागपुर शहर, वर्धा, भंडारा, अमरावती, नागपुर ग्रामीण अशा अनेक ठिकाणच्या मुलांचे पैसे गोळा केले असल्याचे निर्दशनास आले. ज्या मुलांचे पैसे गोळा केले होते त्यांना रेल्वेत, वेस्टर्न कोल इंडिया लि, नॅशनल बॅकेत कामास लावतो अशा प्रकारचे मेसेज मिळुन आले. त्यातील १२ साथीदारांना आर्थीक गुन्हे शाखा येथे समक्ष बोलावुन त्यांचे जबाब नोंद करण्यात आले आहे. त्या जबाबाचे अनुषंघाने व मिळालेल्या माहितीचे आधारे मयत अमित कोवे यांनी बिहार राज्यातील आरोपीत इसम नामे १. कुंदनकुमार उर्फ राहुल सिंग, रमेश शर्मा वय ३४ वर्ष रा. तराढी, पोष्ट बेला, पोलीस स्टेशन नौबदतपुर पटना राज्य. बिहार २. मोहम्मद दानिश जिशान आलम उर्फ रशिद अन्वर आलम उर्फ दानिश जिशान मोहम्मद आलम गिर वय ३५ वर्ष रा. रूहाना हाउस, न्यू खजूर बन्ना, पथर की मस्जिद जवळक पोलीस ठाणे सुलतानगंज पटणा, राज्य बिहार यांना मोठी रक्कम दिल्याचे निर्दशनास आले. नमुद आरोपीतांना भंडारा पोलीस ठाण्याने त्यांचेकडील गुन्हयात दिनांक २५/०३/२०२२ रोजी अटक केली होती. त्यामुळे नमुद आरोपीतांना ट्रान्सफर वॉरंटवर ताब्यात घेवुन या गुन्हयात अटक करण्यात आली. सदरहु आरोपीतांनी मयत आरोपी अमित कोवे यांचे मार्फतिने सन २०१९ पासुन १,३०,००,०००/— घेतल्याचे मोबाईलमधील व्हॉटस्‌अपमध्ये असलेल्या चॅट माहितीवरुन समजुन आले. सदरहु दोन्ही आरोपीतांना रिमांडकामी सावनेर न्यायालयात हजर केले असता, त्यांचे १२ दिवस पोलीस कोठडी रिमांड? घेण्यात आलेला असून सदया दोन्ही आरोपी, मसीआर वर भंडारा जेलमध्ये होणार बंद आहेत.

सदरहु आरोपी नागपुर शहर मधील अजनी पोलीस ठाण्यातील गुन्हयात निष्पन्न झाले असुन, तसे अजनी पोलीस ठा.यास तसेच मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांना सुध्दा कळविण्यात आले आहे.

सदरहु गुन्हयात आरोपीत स्त्री नामे शिल्पा पालपार्ती हिचेकडे चौकशी दरम्यान तिचे जबाब नोंद करण्यात आले होते. परंतु तिचा गुन्हयातील सहभाग स्पष्ट झाल्याने तिला आज रोजी ताब्यात घेण्यात आले असुन, मयत आरोपी अमित कोवेच्या मार्फेतिने तिने नागपुर ग्रामीणचे हददीतील ९ पिडीत साक्षीदार व ३ नागपुर शहर हददीतील ३ पिडीत साक्षीदार यांचेकडुन १,२२,७७,०००/—रु. स्विकारले आहे. आज रोजी तिला रिमांडकामी हजर करण्याची तजविज ठेवली आहे. आरोपीत स्त्री शिल्पा पालपर्ती हिचेवर यापुर्वी १. हुडकेश्वर पोलीस ठाणे, नागपुर शहर अपराध क्रमांक १८४/११ कलम ४२०, ३४ भादवि २. शिवाजी नगर पोलीस ठाणे, नांदेड अपराध क्रमांक २८४/२०१६ कलम ४२०, ४०६, ३४ भादवि. ३. मिरज पोलीस ठाणे, सांगली अपराध क्रमांक २०१३/१४ येथे दाखल आहे.

याव्द्रारे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, नागरीकांना आरोपांनी रेल्वे, एस बी आय, वेकोली, इतर विविध विभागामध्ये नोकरीचे आमीश देवून आर्थिक फसवणुक केलेली असल्यास त्यांनी आर्थिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामिण पोलीस भवन सिव्हील लाईन सहावा माळा बी विंग येथे संम्पर्क करावा.

सदरहु गुन्हयाचा तपास आर्थीक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण हे मा. श्री विजयकुमार मगर, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री. राहुल माकणीकर, अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**